# दलित साहित्यातील शिवराम जानबा कांबळे यांचे कार्य (इ. स. १८७५ ते १९४०)

प्रा. सौ. अरूणा मोरे
इतिहास विभाग प्रमुख
दौंड तालुका कला वाणिज्य महाविद्यालय,
दौंड, जि. पुणे
मो.नं. ९८५००१४५७३

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व म्हणजे २० व्या शतकाच्या पूर्वार्धात व १९ व्या शतकात अस्पृश्योद्धाराचे कार्य करणे महाकठिण होते. परंतू आद्य अस्पृश्योद्धारक गोपाळबाबा वलंगकरांनी महात्मा ज्योतीराव फुल्यांपासून प्रेरणा घेऊन समाजोद्धारासाठी जी पायवाट निर्माण केली त्याचवाटेने प्रतिकूलतेशी संघर्ष करीत शिवराम जानबा कांबळे यांनी आयुष्यभर समाजोद्धारासाठी देह झिजविला.*

१८ व्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्राची परिस्थिती अत्यंत दयनीय होती अटकेपार झेंडे फडकवणारे मराठे हेच का? असा प्रश्न निर्माण झाला. शिवाजी महाराजांचे स्वराज्य स्थापनेचे मर्म पुढील काळातील राज्यकर्त्यांना समजले नाही. ज्या अपसामाजिक प्रथा शिवकालीन राजवटीत बंद केल्या होत्या, त्यांना पुनरूज्जीवन देण्याचे कार्य तत्कालीन राजकर्त्यांनी केले. शिवशाहीपासून मराठ्यांनी काही धडे नक्कीच घेतले. पण ते गिरविण्यात पुढील राज्यकर्त्यांना यश आले नाही. संपूर्ण भारतात हिंदू समाजाची जी रचना होती, तशीच रचना महाराष्ट्रात होती. २० व्या श्शतकात महाराष्ट्रात जी सामाजिक परिस्थिती होती तिचा पूर्वार्ध १९ व्या श्शतकात होता. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी भारतातील व महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक परिस्थितीचा विचार करीत असताना काही गोष्टी ठळकपणे नजरेसमोर येतात त्या म्हणजे मध्ययुगीन हिंदू धर्माचा विचार करीत असताना कर्मकांडाचा समावेश असणारा हिंदू धर्म सर्व समावेशक नसून तो अधिक संकूचित व बंदिस्त असल्याचे जाणवते.

श्शास्त्र, रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, जातीभेद यांचा पगडा असलेल्या तत्कालीन समाजात स्वतंत्र विचारांना, व्यक्तीवादाला वाव नव्हता. त्या काळातील नीतीही सद्सद्विवेकाऐवजी आज्ञापालनावर आधारीत होती. त्या नीतीला धर्ममान्य राजकीय, सामाजिक, आर्थिक व्यवस्थांची चौकटींची बंधने होती. प्रत्येकाची कर्तव्ये व प्रतिष्ठा ब्राम्हणांचा अधिकार व श्रेष्ठत्व निर्वीवाद होते. कुटुंब व विवाहासारख्या सामाजिक संस्थांचे स्वरूप प्रामुख्याने धार्मिकच होते. जातीव्यवस्था व स्त्रियांचे दुय्यम स्थान हे सामाजिक असमानतेचे द्योतक होते. तर अस्पृश्यता व स्त्रियांची अवस्था या गोष्टी मानवतावादाच्या विरोधी होत्या.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात बाबा पद्मजी, विष्णुबुवा ब्रम्हचारी, सर चंदावरकर, श्री. केळूस्कर, सी. के. बोले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी समाजधुरिणांनी अस्पृश्यांविषयी कार्य केले. या सर्व समाज सुधारकांचा भर स्पृश्यांच्या मतपरिवर्तनावर होता. परंतू उच्चवर्णियांच्या दयाबुध्दीवर किंवा मतपरिर्वतनावर विसंबून राहून शुद्र—अतिशुद्रांची उन्नती होणार नाही. याची महात्मा ज्योतीराव फुले यांना खात्री होती. म्हणून त्यांनी सनातन्यांच्या विरोधी बंडाच्या मार्गाचा अवलंब केला. त्यांच्या कार्यापासूनच महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने अस्पृश्योद्धाराचा कार्याला प्रारंभ झाला. तसेच अस्पृश्य समाजातून नेते तयार व्हावेत व त्यांनी समाजोद्धाराचे कार्य करावे असा महात्मा ज्योतीराव फुलेंचा प्रयत्न होता.

त्यांच्याच तालमीत तयार झालेल्या गोपाळबाबा वलंगकरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व काळात अस्पृश्योध्दार कार्याची मुहूर्तमेढ रोवली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व म्हणजे २० व्या शतकाच्या पूर्वार्धात व १९ व्या शतकात अस्पृश्योद्धाराचे कार्य करणे महाकठिण होते. परंतू आद्य अस्पृश्योद्धारक गोपाळबाबा वलंगकरांनी महात्मा ज्योतीराव फुल्यांपासून प्रेरणा घेऊन समाजोद्धारासाठी जी पायवाट निर्माण केली त्याचवाटेने प्रतिकूलतेशी संघर्ष करीत शिवराम जानबा कांबळे यांनी आयुष्यभर समाजोद्धारासाठी देह झिजविला. समाजकार्यासाठी त्यांना वृत्तपत्राचे महत्व पटले व त्यांनी ''सोमवंशीय मित्र'' हे मासिक स्वखर्चाने सुरू केले. इ. स. १९०८ ते इ. स. १९१० या कालावधीत अत्यंत जिद्दीने ते चालविले. परंतु तत्कालीन समाज अशिक्षित व दरिद्री असल्याने त्यांच्याकडून वृत्तपत्राला आश्रय मिळण्याऐवजी समाजातील परंपरागत प्रथा, परंपरा मोडण्याचे समाजविरोधी कृत्य हे वृत्तपत्र करते हे लक्षात आल्यावर स्थितीप्रिय समाजाने ते बंद पाडण्याचा चंग बांधला व शेवटी शिवराम जानबा कांबळे यांना ''सोमवंशीय मित्र'' बंद करावे लागले. परंतू या अल्पकाळात समाजसुधारण्याच्या दृष्टीने ''सोमवंशीय मित्र'' ने बहिष्कृतांचा खरा मित्र या भूमिकेतून केलेल्या कार्याला अनन्यसाधारण महत्व आले. शिवराम जानबा कांबळे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व काळातील पहिले पत्रकार, मुद्रक, प्रकाशक व संपादक म्हणून ओळखले जातात.

शिवराम जानबा कांबळे यांच्या कार्याची व्याप्ती पाहता फक्त अस्पृश्यांचा उध्दार करणे हाच त्यांचा हेतू असावा असे वाटेल, परंतू शिवराम जानबा कांबळे विशाल अंत:करणाचे होते. ''दुरितांचे तिमिर जावो'' व त्याच्या बरोबर नवसमाज निर्मितीचा त्यांचा ध्यास होता. त्या संदर्भात अल्पशिक्षित व अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतून जन्माला आलेल्या शिवराम जानबा कांबळे यांनी सर्वशक्तीमान परमेश्वराकडे केलेली मागणी वैचारीक दृष्टीकोनातून श्रेष्ठ असलेली दिसून येते.

RESEARCH JOURNEY

**''अज्ञानी आहेत त्यांना ज्ञानी कर**
**गर्विष्ट आहेत त्यांना लीन कर**
**दुर्वनास रत आहेत त्यांना मार्गावर आण**
**ज्यांना धैर्य नाही त्यांना धैर्य दे**
**जे निराश आहेत त्यांना आशा दे**
**जे आळशी आहेत त्यांना उद्योगी कर**
**जे संकटात आहेत त्यांची मुक्तता कर**
**जे अन्नान्न करीत भटकत आहेत**
**त्यांना भरपूर अन्न दे**
**आमच्यात जे न्यून आहे ते परमेश्वरा**
**तू काढून टाक**
**आमच्यावर दया कर—क्षमा कर''!**

शिवराम जानबा कांबळे यांचा जन्म जरी सधन आणि शिक्षणसंपन्न कुलात झाला नाही. तरी त्यांना ज्या अल्प—स्वल्प ज्ञानाचा लाभ झाला. त्या शिक्षणाचा त्यांच्या मनावर अत्यंत इष्ट व योग्य संस्कार झाला. त्या शिक्षणाच्या योगानेच त्यांना आपल्या समाजाची किती अधोगती झाली याची जाणीव उत्पन्न होऊन त्यातून

त्यांची मुक्तता करण्याच्या हेतूने त्यांनी तन–मन–धन पूर्वक आणि निरपेक्ष बुध्दीने अत्यंत कळकळीने प्रयत्न केले. ते आपल्या समाजासमोर, देशासमोर परिणामी जगासामोर यावेत हा प्रामाणिक प्रयत्न आहे. शिवराम जानबा कांबळे यांनी आपल्या कार्यात सतत ''पुन्हा प्रयत्न करून पहा'' हा मंत्र जपला. शिवराम जानबा कांबळे ही अशी व्यक्ती आहे की त्यांच्यापासून घेण्यासारखे बरेच आहे. शिवराम जानबा कांबळे यांनी स्वत:चा कामधंदा सांभाळून अस्पृश्य जनतेच्या उध्दारार्थ बरेच प्रयत्न केले. या कार्याची निष्पत्ती तत्कालीन समाजात झालेली दिसून येते. अनेक वेळा रूढी, परंपरा, चालीरीति यांवर शिवराम जानबा कांबळे यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणले.

शिवराम जानबा कांबळे यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून ते प्रश्न सरकार दरबारी मांडले. समाजातील अनिष्ठ प्रथांना विरोध केला व समाजमनपरिवर्तन घडवून आणले ही महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्वपूर्ण बाब आहे. शिक्षणाशिवाय उध्दार नाही हे शिवराम जानबा कांबळे यांनी ओळखले. सोमवंशीय मित्राच्या माध्यामातून त्यांनी आपले शिक्षण विषयक विचार व्यक्त केले. सोमवंशीय मित्राच्या माध्यामातून वाघ्या–मुरळीप्रथा, बहुपत्नीत्व, दारूचे व्यसन, अस्पृश्यांची लष्कर व इतर खात्यात भरती व्हावी, अस्पृश्यांत शिक्षणाचा प्रसार व्हावा इ. सामाजिक व इतर विषयांवर या वृत्तपत्राच्या माध्यामातून त्यांनी पोटतिटकिने जनजागरण करावयाचा प्रयत्न केला. या महत्वपूर्ण कामगिरीचा अभ्यास होणे गरजेचे आहे. शिवराम जानबा कांबळे यांचा संपर्क प्रत्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे या महान दलितोध्दारकांशी आला होता. या महान विभूतींशी असलेला त्यांचा संबंध, विचारप्रवाह, त्यांचे कर्तृत्व, मेहनत, तळमळ यांची जाणीव आजच्या समाजाला होणे गरजेचे आहे. त्यांच्या विचारांनी समाजातील उरला–सुरला भेद नष्ट करण्याची प्रेरणा मिळावी. म्हणून त्यांच्या जीवन चरित्रावर सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. ज्यामुळे अस्पृश्य समाज म्हणून हिणवल्या जाणाऱ्या समाजात 'जन्म घेऊन स्पश्यानांही लाजवेल अशी महान, चिरंतर व सर्व समावेशक कामगिरी करणाऱ्या या कर्तृत्वश्रेष्ठ, प्रामाणिक तळमळ असणाऱ्या समाजसेवकाच्या कार्याचा अभ्यास करण्यासाठी हा शोध निबंध प्रपंच!

RESEARCH JOURNEY

**संदर्भग्रंथ**

**अ. प्राथमिक साधने**

१. ह. ना. नवलकर, ''शिवराम जानबा कांबळे'' (प्रथम आवृत्ती १९३०), सुगावा प्रकाशन, पुणे
२. गोपाळबाबा वलंगकर, ''विटाळ विध्वंसन'' (२००७), सुगावा प्रकाशन, पुणे
३. सीताराम बाबाजी लांडगे, ''पर्वती सत्याग्रह व सनातनी उर्फ सैतानी स्पृश्य'' (प्रथम आवृत्ती १९३२), सुगावा प्रकाशन, पुणे
४. माळी व. गो. संपादीत– समग्र महात्मा फुले, ''गुलामगिरी''– व फोटो झिंको प्रेस, पुणे

**पत्रे**

१. शिवराम जानबा कांबळे यांचे श्री. कोठारी यांस पत्र दि. ०२/०४/१९२६
२. श्री. पाताडे यांचे शिवराम जानबा कांबळे यांस पत्र दि. २७/०१/१९३०
३. भास्करराव जाधव यांचे शिवराम जानबा कांबळे यांना पत्र दि. २७/०४/१९३०
४. शिवराम जानबा कांबळे यांचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या सेक्रेटरींना पत्र दि.२४/०६/१९३०

५. के. एम. गुप्ते (असिस्टंट सेक्रेटरी महाराजा सयाजीराव गायकवाड) यांचे शिवराम जानबा कांबळे यांना पत्र

**वृत्तपत्रे**

१. ज्ञानप्रकाश दि. १३/०७/१९३०
२. दीनबंधू दि. २०/०६/१९३०
३. विजयी मराठा दि. ०८/१२/१९३०
४. जगद्वृत्त दि. १९०८
५. सुधारक दि. १४/११/१९०४

**दुय्यम साधने .**

१. प्रा. सी. एच निकुंभे, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व समाजसुधारक: शिवराम जानबा कांबळे'' (२०११) पायल प्रकाशन, पुणे
२. डॉ. दिलीप चव्हाण– जात– मीमांसा
३. डॉ. अनिल कठारे– शिवकाळ व पेशवईतील महारांचा इतिहास
४. डॉ. कृष्णा किरवले–दलित साहित्य आणि चळवळ
५. नागनाथ कोतापल्ले – वादळाचे वंशज
६. धनंजय कीर – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र